दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१८ ■ बुधवार, दि. १९ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -318 ■ Wednesday, 19 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## सुनीता विल्यम्स ९ महिन्यांनंतर अवकाशातून पृथ्वीवर परतणार

**फ्लोरिडा :** अंतराळात अडकलेल्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर ९ महिने आणि १३ दिवसांनंतर पृथ्वीवर परतत आहेत. त्यांच्यासोबत, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात उपस्थित असलेले क्रू-९ चे आणखी दोन अंतराळवीर, निक हेग आणि अलेक्झांडर गोर्बुनोव्ह यांनी १८मार्च रोजी अंतराळ स्थानक सोडले. चारही अंतराळवीर ड्रॅगन अंतराळयानात चढल्यानंतर,सकाळी ८:३५ वाजता अंतराळयानाचा हॅच बंद करण्यात आला. नऊ महिन्यांहून अधिक काळानंतर,नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकमधून बाहेर पडणार आहेत आणि पृथ्वीवर परतण्यासाठी त्यांचा १७ तासांचा प्रवास सुरू करणार आहेत. विल्मोर, विल्यम्स आणि इतर दोन अंतराळवीर सकाळी १०:३० वाजता आयएसएसमधून बाहेर पडणार आहेत आणि पहाटे ३:३० वाजता



अमेरिकेच्या आखातात उतरण्याची शक्यता आहे. अंतराळवीर क्रू निक हेग आणि रोस्कोसमोस कॉस्मोनॉट अलेक्झांडर गोर्बुनोव्ह यांच्यासोबत स्पेसएक्स क्रू ड्रॅगन स्पेसक्राफ्टमधून पृथ्वीवर परतणार आहे.

नासा लाईव्ह असताना,निक हेग,सुनी विल्यम्स,बुच विल्मोर आणि कॉस्मोनॉट अलेक्झांडर गोर्बुनोव्ह क्रू९ स्पेस स्टेशनवरून निघण्याची तयारी करत असताना त्यांचे सामान बांधताना आणि दरवाजे बंद करताना दिसले. निक हेग म्हणाले, स्पेस स्टेशनला घर म्हणणे, मानवतेसाठी संशोधन करण्याच्या २५ वर्षांच्या वारशात माझा वाटा उचलणे आणि जगभरातील सहकाऱ्यांसोबत, आता मित्रांसोबत काम करणे हा एक विशेषाधिकार आहे. माझ्या बहुतेक अंतराळ उड्डाण कारकीर्दीत अनपेक्षित गोष्टी घडल्या आहेत.

**पंतप्रधान नरेंद्र मोदीकडून भारतात येण्याचे दिले निमंत्रण**

नासाच्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विलियम्स पृथ्वीवर परतण्यासाठी सज्ज आहेत. अंतराळात अडकलेली सुनीता तिचा सहकारी बुच विलमोर यांच्यासोबत परतण्यासाठी अंतराळ यानात बसली आहे.दरम्यान,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विलियम्स यांना पत्र लिहिले आहे. तुम्ही हजारो मैल दूर असलात तरी तुम्ही आमच्या हृदयाच्या जवळ आहात, असे पत्र लिहून पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी तुम्हाला भारतातील लोकांकडून शुभेच्छा देतो. आज एका कार्यक्रमात, मी प्रसिद्ध अंतराळवीर श्री माइक मॅसिमिनो यांना भेटलो. आमच्या संभाषणादरम्यान, तुमचे नाव आले आणि आम्हाला तुमचा आणि तुमच्या कामाचा किती अभिमान आहे यावर चर्चा केली. या संभाषणानंतर, मी स्वतःला तुम्हाला पत्र लिहिण्यापासून रोखू शकले नाही. मी जेव्हा अमेरिकेच्या माझ्या दौऱ्यांदरम्यान अध्यक्ष ट्रम्प किंवा अध्यक्ष बायडेन यांना भेटले, तेव्हा मी तुमच्या कुशलतेबद्दल विचारले. पंतप्रधान पुढे म्हणाले की, २०१६ मध्ये अमेरिकेच्या माझ्या दौऱ्यात तुमच्यासोबत झालेली भेट मला आठवते.ङ्कमी तुमच्या परतीनंतर तुम्हाला भारतात पाहण्यास उत्सुक आहे. भारताच्या सर्वोत्तम मुलींपैकी एकीला होस्ट करणे ही आनंदाची बाब असेल.

## प्रशांत दामले यांचा नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई :** नवीन कार्यकारिणी नियुक्त झाल्यापासून झपाट्याने कामे पूर्ण करण्याचा धडाका लावणारे अखिल भारतीय मराठी



नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांनी अचानक पदाचा राजीनामा देत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. मात्र, नाट्य परिषदेच्या कार्यकारिणी मंडळाने दामले यांचा राजीनामा नामंजूर केला. माटुंगा येथील यशवंत नाट्य संकुलातील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कार्यालयात सोमवारी नियामक मंडळाची बैठक झाली. या बैठकीत अध्यक्ष प्रशांत दामले यांनी राजीनामा देत सर्वांनाच धक्का दिला. नियामक मंडळाच्या सदस्यांनी राजीनामा एकमताने नामंजूर करत तुम्हाला आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करू, असे सांगत दामले यांनाच अध्यक्षपदावर कायम राहण्यास सांगितले. याबाबत दामले म्हणाले की, नाटकांच्या प्रयोगांची संख्या वाढल्याने, तसेच आणखी दोन नवीन प्रोजेक्ट येणार असल्याने कामाचा ताण वाढला आहे. त्यामुळे अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची इच्छा व्यक्त करत मी राजीनामा दिला होता. आता परिषदेचे कामकाज स्थिरस्थावर झाले आहे. सर्व कामे मार्गी लागली आहेत. नाट्य परिषदेची विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसली आहे. मी माझी जबाबदारी पूर्ण केली. त्यामुळे आता मला मुक्त करा, असे सांगितले; पण कोणीही ऐकायला तयार नव्हते. अध्यक्षपदावर तुम्हीच राहायला हवे. कामाची विभागणी कशी करता येईल ते पाहू, असे नियामक मंडळाचे सदस्य म्हणाले. परिषदेच्या कामाचा ताण घेऊ नका, पण तुम्ही थांबा, असेही मंडळाने सांगितले. सर्वांनी राजीनामा नामंजूर केल्याने त्यांच्या इच्छेसमोर माझे काहीच चालू शकले नाही, असेही दामले म्हणाले.

## वधूचे लग्नाच्या तिसऱ्या दिवशी दागिन्यांसह पलायन

**जळगाव :** जळगावात एका तरुणाचे लग्न एजंटच्या मध्यस्थीने ठरवण्यात आले, मात्र नववधूने लग्नाच्या तिसऱ्याच दिवशी ८४ हजार रुपयांचे दागिने घेऊन घरातून पसार होत वरपक्षाची तब्बल २.४४ लाख रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार १४ ते २३ फेब्रुवारी दरम्यान घडला असून, एमआयडीसी पोलीस ठाण्यात वधूसह एजंट आणि इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामेश्वर कॉलनीतील २७ वर्षीय रिक्षाचालक तरुण कुटुंबासह राहतो. बराच काळ वधू न मिळाल्याने त्याच्या आईने बऱ्हाणपूर येथील एजंट आशाबाई हिच्याशी संपर्क साधला. आशाबाईने पूजा गंगाराम गावडे (रा. पिंपरी महेपाल, जि. यवतमाळ) ही मुलगी दाखवली आणि एकूण १.६० लाख रुपयांचा व्यवहार ठरला. १८ फेब्रुवारी रोजी एजंट आशाबाई, वधू पूजा गावडे, तिची आई निर्मलाबाई डोंगरे, मावसा शिवशंकर आणि मामा गोपाळ खंडारे हे तरुणाच्या घरी आले. दुसऱ्याच दिवशी १९ फेब्रुवारी रोजी तातडीने लग्न लावून देण्यात आले. पैसे मिळताच एजंट आणि वधूचे नातेवाईक लग्नमंडपातून निघून गेले. २२ फेब्रुवारी रोजी रात्री सर्वजण झोपल्यानंतर वधू पूजा गावडे अचानक घरातून गायब झाली. सकाळी घरच्यांनी पाहिले असता, ती ८४ हजार रुपयांचे मणी-मंगळसूत्र, कर्णफुले आणि सोनपोत घेऊन पसार झाल्याचे लक्षात आले. तरुणाने एजंट आणि वधूच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. अखेर, फसवणुकीची जाणीव झाल्यानंतर तरुणाने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार एजंट आशाबाई, पूजा गावडे, निर्मलाबाई डोंगरे आणि शिवशंकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देशातील सर्व शिक्षण मंडळे आता समान पातळीवर

**पुणे**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र सरकारकडून देशभरातील सर्व शिक्षण मंडळे समान पातळीवर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या आनुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ) आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) यांच्यातर्फे १७ ते २१ मार्च या कालावधीत नववी ते बारावीच्या शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, त्यात समग्र प्रगतीपत्रक माध्यमिक स्तर व प्रश्नपत्रिकांचे प्रमाणीकरण याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ मधील बदलांना अनुसरून शिक्षकांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने पुण्यातील यशदा येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षण विभागाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाचे अतिरिक्त सचिव आनंदराव पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, एनसीईआरटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि परखच्या विभागप्रमुख डॉ. इंद्राणी भादुरी, राज्य मंडळ अध्यक्ष, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी, योजना संचालक डॉ. महेश पालकर, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील उपस्थित राहणार आहेत. इयत्ता नववी ते बारावी या वर्गांतील विद्यार्थ्यांचा समग्र विकास आणि प्रगतीशी संबंधित मूल्यांकन प्रक्रियेसाठी परख या राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. परख अंतर्गत समग्र प्रगतीपत्रक ही संकल्पना मांडण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वंकष प्रगतीचे मूल्यांकन करण्याचा उद्देश त्यामागे आहे. त्यामुळे समग्र प्रगतीपत्रक, प्रश्नपत्रिका निर्मिती, पृथक्करण व प्रमाणीकरण करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित केले जाणार आहे.

विविध राज्यांच्या प्रश्नपत्रिकांच्या तुलनात्मक अभ्यासावरही या कार्यशाळेत प्रकाश टाकला जाणार आहे. राज्य मंडळाकडून निर्मित केल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिका अधिकाधिक अचूक आणि उच्चतम दर्जाच्या निर्माण करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

## पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी मध्यरात्री शहरातील महत्त्वाच्या भागात गस्त घालून पाहणी केली



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची वाट न पाहता, आधीच प्रतिबंध करणे हाच उत्तम उपाय! शहरातील सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी मा. पोलिस आयुक्त प्रवीण पवार सर स्वतः मध्यरात्री गस्तीवर आले. पहिलेच प्रतिसाद देणारे अधिकारी – कोणतीही आपत्ती ओढवली तर सर्वप्रथम घटनास्थळी पोहोचणारे अधिकारी. पहिलेच पायी पेट्रोलिंग करणारे आयुक्त – मुख्य रस्त्यांवर रात्री गस्त घालून सुरक्षेचा थेट आढावा. नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध – अपराध व अनुचित प्रकार रोखण्यासाठी अहोरात्र तत्पर असल्याचे दिसून आले. छत्रपती संभाजीनगर पोलीस दल – सुरक्षिततेसाठी सदैव सज्ज! नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच त्यांच्या कामाचे कौतुकही केले.

## कायदा सुव्यवस्था व शांतता अबाधित; प्रशासन सज्ज, चोख बंदोबस्त

### अफवांवर विश्वास ठेवू नका-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील कायदा- सुव्यवस्था व शांतता अबाधित आहे. प्रशासन सज्ज असून चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता कायम राखावी व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुलताबाद येथे केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुलताबाद येथील औरंगजेब कबर सुरक्षाव्यवस्थेची पाहणी करुन आढावा घेतला. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, तहसिलदार स्वरुप कंकाळ,पुरातत्व विभागाचे राजेश वाकेकर तसेच सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आदी उपस्थित होते.

खुलताबाद तहसिल कार्यालयात झालेल्या बैठकीत पोलीस अधीक्षक राठोड यांनी सांगितले की, खुलताबाद येथे पुरेसा बंदोबस्त असून



वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ३० पोलीस, राज्य राखीव बल गटाची ५० जवानांची एक तुकडी, ८० होमगार्ड यांचा त्यात समावेश आहे. सर्व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. प्रत्येक येणाऱ्या व्यक्तिची नोंद घेतली जात आहे. हा बंदोबस्त २४ तास असून संपूर्ण खुलताबाद परिसरात ड्रोन पेट्रोलिंगही केले जात आहे. पोलिसांच्या ड्रोन व्यक्तिरिक्त अन्य ड्रोनच्या उड्डाणांना बंदी आहे. याशिवाय पोलीस सोशल मिडियाबाबत अत्यंत दक्ष असून चुकीची माहिती अथवा भावना भडकवणाऱ्या मजकूरावर सायबर सेल मार्फत लक्ष आहे. अशा वादग्रस्त पोस्ट शेअर करणाऱ्या व्यक्तिंविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल,असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय प्रत्येक गावातील पोलीस पाटलांनी त्यांच्यामार्फत ग्रामसुरक्षा ॲपवर माहिती द्यावी. १८००२७०३६०० असा ग्राम सुरक्षा ॲपचा क्रमांक आहे. शिवाय नागरिक ११२ या क्रमांकावरही आपल्याकडील माहिती देऊ शकतात. आपल्या परिसरात शांतता राखणे हे आपले कर्तव्य असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, गावातील संशयास्पद व्यक्तिंच्या हालचालींवर लक्ष ठेवावे. त्याबाबत तात्काळ पोलिसांना सांगावे सतर्क व सजग रहावे.गाव पातळीवर माहिती देऊन ग्रामस्थांनाही माहिती देण्यास सांगावे. सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परस्परांशी संपर्क साधावा,असेही त्यांनी सांगितले. अफवांवर विश्वास ठेवु नये. सोशल मिडियावरही लक्ष ठेवावे. आक्षेपार्ह मेसेज पाठविले जात असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ग्रामपातळीवरील यंत्रणेला दिले.

# काय सांगतो आर्थिक अहवाल ?

राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात वीस टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे भारतातील दुसरे सर्वात औद्योगिक राज्य आहे. महाराष्ट्राच्या उद्योगांचे देशाच्या एकूण उद्योगांमध्ये ४६ टक्के योगदान आहे. राज्याच्या आसपासच्या अनेक शहरांमध्ये सॉफ्टवेअर पार्क्स असून ८० हजार कोटींहून अधिक वार्षिक निर्यातीसह महाराष्ट्र सॉफ्टवेअरचा दुसरा सर्वात मोठा निर्यातदार आहे. अर्थात राज्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण झाले असले, तरी अजूनही राज्यातील अनेक भागांमध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. कार्यरत वयोगटातील २४.१४ टक्के लोकसंख्या शेती आणि संबंधित कामांमध्ये कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही महिन्यांपासून विदेशी गुंतवणुकीचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेत आल्याचे दिसून आले. विरोधकांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक दुसऱ्या राज्यात, विशेषत: गुजरातमध्ये गेल्याचा दावा केला. त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील रोजगाराचे मोठे नुकसान झाल्याचेही नमूद केले. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला यामुळे फटका बसल्याचे बोलले गेले. या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी निवडून आलेल्या देवेंद्र फडणवीस सरकारचा पहिला अर्थसंकल्पही चर्चेत आहे. मात्र त्याच वेळी राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालाकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते. तो अलीकडेच समोर आला आणि राज्याची विविध क्षेत्रांमधील कामगिरी समोर आली.

राज्याचा आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवाल विधिमंडळाच्या पटलावर अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केला. या अहवालाद्वारे वृद्धी दर आणि भावी योजनांची आकडेवारी मांडण्यात आली. देशाच्या अर्थव्यवस्थेशी तुलना केली असता राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर ७.३ टक्के इतका राहण्याची अपेक्षा आहे. देशाच्या ६.५ टक्के विकासदरापेक्षा तो अधिक असणे अभिमानास्पद आहे, पण इथे महसुली जमा आणि खर्चामधील तफावत दुर्लक्षित करून चालणार नाही. उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या वाढीत आलेली घट आणि महसुली खर्चात जमेपेक्षा झालेली वीस हजार कोटींची वाढ हा सरकारच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. २०२४-२५ या वर्षात सुमारे पाच लाख कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित आहे. प्रत्यक्षात ती जानेवारी २०२५ पर्यंत ३ लाख ८२ हजार कोटी म्हणजे अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७६.३ टक्के आहे. राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या मानाने खर्च जास्त होत असून भांडवली खर्चासाठी नव्याने कर्ज घेण्याशिवाय पर्याय नाही, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याच्या दरडोई उत्पन्नात काही प्रमाणात समाधानकारक प्रगती अपेक्षित आहे. गेल्या वर्षीच्या दोन लाख ७८ हजार ६८१ रुपयांच्या तुलनेत यंदाचे अंदाजित दरडोई उत्पन्न तीन लाख ९ हजार ३५० रुपये आहे. ही एक जमेची बाजू असली तरी उद्योग आणि सेवाक्षेत्राची वाढ मंदावली आहे. दुसरीकडे २०२४-२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांमध्ये राज्यात एकूण १ लाख ४० हजार कोटी रुपये थेट परकीय गुंतवणूक आली. हा गेल्या दहा वर्षांमधील विक्रम आहे. यंदा राज्यातील उद्योग विभागाच्या वृध्दीदरात कमालीची घट होऊन तो ६.२ वरून ४.९ टक्के इतका घसरण्याची भीती पाहणी अहवालात व्यक्त केली गेली आहे तर सेवाक्षेत्राच्या वृद्धीदरात ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्के इतकी घसरण अपेक्षित आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याचे २०२४-२५ मधील स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये इतके आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्जावरील व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे. येत्या काळात महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर ७.३ टक्के राहील. कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७ टक्के, उद्योगक्षेत्राचा ४.९ टक्के तर सेवा क्षेत्राचा विकासदर ७.८ टक्के असणार असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत अहवालानुसार, महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ पर्यंत १८८४ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत.

# औरंगजेबाचे गोडवे गाणारे देशद्रोहीच; एकनाथ शिंदेंचा घणाघात

**डोंबिवली**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

औरंगजेब हा महाराष्ट्राचा घास घेण्यासाठी आला होता. पण छत्रपती शिवाजी महाराज एक दैवी शक्ती होते. औरंगजेबाने संभाजी महाराजांप्रती क्रुरता दाखवली. या औरंगजेबाचे गोडवे काही लोक गातात. हे गोडवे गाणारे देशद्रोहीच आहेत, असा घणाघात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

डोंबिवली पूर्वेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा एक तरी गुण प्रत्येकाने अंगिकारला पाहिजे. हीच छत्रपती शिवाजी महाराज यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही प्रतिपादन एकनाथ शिंदे यांनी केले. या सोहळ्याला हजारोंच्या संख्येने डोंबिवलीकर उपस्थित होते.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून डोंबिवली पूर्वेतील घारडा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. दिमाखदार सोहळ्यात या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी हजारो डोंबिवलीकरांनी याची देही याची डोळा हा सोहळा अनुभवला.

या सोहळ्यासाठी दुपारपासूनच अबाल वृद्धांनी घारडा चौकात गर्दी केली होती. यावेळी हा चौक यापुढे घारडा सर्कल नाही तर छत्रपती शिवाजी महाराज चौक या नावाने ओळखला जाईल, असे यावेळी एकनाथ शिंदे यांनी घोषित केले. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. अखंड हिंदुस्थानचा अभिमान म्हणजे शिवछत्रपती, हिंदुत्वाचा हुंकार म्हणजे शिवछत्रपती. लोकशाहीचा अविष्कार म्हणजे शिवछत्रपती, शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शिवछत्रपती म्हणजे धैर्य, शिवछत्रपती म्हणजे शौर्य, शिवछत्रपती म्हणजे त्याग, शिवछत्रपती म्हणजे समर्पण, शिवछत्रपती म्हणजे दूरदृष्टी, शिवछत्रपती म्हणजे निती, शिवछत्रपती म्हणजे युगपुरूष, शिवछत्रपती म्हणजे प्रवर्तक, शिवछत्रपती म्हणजे रयतेचा राजा अशा शब्दात शिंदे यांनी महाराजांची थोरवी गायली. या पुतळ्याची रचना वेगळी आहे. छत्रपती शिवाजी महाराज पूर्णपणे जनतेला दर्शन देताना या पुतळ्यात दिसतात असे सांगत त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या टीमचे अभिनंद केले. हा पुतळा पुढील पिढ्यांना इतिहासाची आठवण करून देत राहिल. तरूण पिढी, मुलांना उर्जा देत राहील. डोंबिवलीकर शिवभक्तांना या पुतळ्यातून प्रेरणा मिळेल, असेही शिंदे यावेळी म्हणाले.

आपले सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर चालणारे सरकार आहे. विकासाला पुढे नेणारे, लोकाभिमुख योजना राबवणारे हे सरकार असल्याचेही शिंदे यावेळी म्हणाले. औरंगजेब महाराष्ट्राचा घास घ्यायला आला होता.

औरंगजेबाने संभाजी महाराजांप्रती क्रुरता दाखवली. त्याचे समर्थन करणारे देशद्रोहीच आहेत असे यावेळी शिंदे म्हणाले. प्रत्येकाने महाराजांच्या गुणांपैकी एक तरी गुण अंगिकारला पाहिजे. हीच महाराजांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर एक काव्य सादर करत त्यांच्या पराक्रमाची थोरवी गायली. यावेळी हिंदुराष्ट्र सेनाप्रमुख धनंजयभाई देसाई, समाजप्रबोधनकार ह.भ.प. संग्रामबापू भंडारे महाराज, जगन्नाथ पाटील, आमदार राजेश मोरे, गोपाळ लांडगे, महापालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांच्यासह हजारो डोंबिवलीकर, शिवभक्त, शिवसेनेने पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूरच्या अनेक भागात संचारबंदी!

## नागपूरच्या अनेक भागात संचारबंदी! दंगलीनंतर आता शहरात तणावपूर्ण शांतता

नागपूर : नागपुरात सोमवारी झालेल्या दंगलीनंतर शहराच्या काही भागात संचारबंदी लावण्यात आली आहे. रात्रभर पोलिस परिस्थिती सामान्य करण्यासाठी प्रयत्नरत होते. त्यासाठी कलम १६३ अनंतर्गत संवेदनशील वस्त्यांमध्ये संचारबंदी लावण्यात आली असून सध्या तणावपूर्ण शांतता पसरली आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार, सोमवारी छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती होती. यानिमित्ताने विश्व हिंदू परिषदेने छत्रपती शिवाजी चौकात आंदोलन केले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील औरंगजेबची कबर हटवण्यात यावी अशी या आंदोलकांची मागणी होती. यावेळी आंदोलकांनी औरंगजेबचे फोटो आणि प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध नोंदवला. अतिशय शांततेत हे आंदोलन पार पडले. त्यानंतर सोशल मिडीयावर काही अफवांचे व्हिडीओ आणि पोस्ट व्हायरल झाल्यात. त्यानंतर संध्याकाळी ७.३० वाजेच्या सुमाराला चिटणीस पार्कच्या समोर असलेल्या कांग्रेसच्या देवडिया भवन कार्यालयाच्या शेजारी असलेल्या धार्मिक स्थळाच्या समोर लोक एकत्र झाले. त्यानंतर हा जमाव चाल करून छत्रपती चौकाच्या दिशेने निघाला. यावेळी या जमावातून आक्षेपार्ह घोषणाबाजी आणि दगडफेक करण्यात आली.

दंगलखोरांच्या दगडफफेकीत अनेक पोलिस देखील जखमी झाले. तसेच जमावाच्या हल्ल्यात ४ पोलिस अधिकारी जखमी झालेत. पोलिस उपायुक्त, निकेतन कदम यांच्या हातावर कुऱ्हाडीचा वार झाल्यामुळे ते रक्तबंबाळ झाले. तर दगडफफेकीत डीसीपी शशिकांत सातव यांचा पाय फ्रॅक्चर झाला असून डीसीपी अर्चित चांडक यांना गंभीर लिगामेंटल इंज्यूरी झाली आहे. त्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर डीसीपी राहुल मदने देखील दगडफेकीत किरकोळ जखमी झाले आहेत.

वातावरण पूर्ववत करण्यासाठी पोलिसांनी रात्री नागपूर शहरातील कोतवाली, गणेशपेठ, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरा नगर आणि कपिल नगर या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत कर्फ्यू लावला असून पुढील आदेश येईपर्यंत हा कर्फ्यू लागू राहील, असे पोलिस आयुक्त डॉ. रविंदर कुमार सिंगल यांनी सांगितले. दरम्यान आज, मंगळवारी नागपुरात तणावपूर्ण शांतता आहे.

# अंतराळातून परतल्यानंतर सुनीता विल्यम्सला होऊ शकतात आरोग्याच्या या समस्या

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था नासाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर तब्बल ९ महिन्यांनंतर पृथ्वीवर परतले आहेत. बुधवारी स्पेसएक्सच्या ड्रॅगन कॅप्सूलच्या मदतीने फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर त्यांचे यशस्वी लँडिंग झाले. त्यांचे अंतराळ मिशन ५ जून २०२४मध्ये सुरू झाले होते. हे मिशन केवळ ८ दिवसांचे होते. मात्र तांत्रिक समस्येमुळे ते ९ महिने अंतराळात अडकून होते. अंतराळात इतका दीर्घकाळ घालवल्यानंतर त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.जाणून घेऊया अंतराळातून परतल्यानंतर सुनीता विल्यम्सला कोणकोणत्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**हाडे आणि मांसपेशीवर परिणाम** - सर्वाधिक चिंता आहे ती म्हणजे हाडे आणि मांसपेशी कमकुवत होणे. खडडमध्ये अंतराळवीर मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये तरंगत असतात याचा परिणाम त्यांच्या शरीरावर होतो. पृथ्वीवर आपले शरीर नेहमी गुरूत्वाकर्षणाच्या विरोधात काम करते यामुळे आपल्या मांसपेशी आणि हाडांचा सतत व्यायाम होत असतो. मात्र अंतराळात असे नसल्याने मांसपेशींची ताकद आणि हांडाची घनता कमी होऊ लागते. अंतराळवीर दर महिन्याला आपल्या हाडांचा १ टक्के भाग गमावू शकतात. खासकरून कंबर, त्या खालचा भाग यावरील हाडांना त्रास होतो. यामुळे पृथ्वीवर परतल्यानंतर हाडे तुटण्याचा धोका अधिक असतो. हे कमी करण्यासाठी अंतराळवीर अंतराळात व्यायामही करतात. अंतराळात अंतराळवीरांच्या पायांवर जास्त दबाव पडत नाही. यामुळे पायाशी संपर्क झाल्याने निर्माण होणारी कठोर त्वचा मुलायम होते. यामुळे त्यांच्या पायांची त्वचा संवेदनशील होते.

दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने त्यांच्या हृदयावरही परिणाम होतो. पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण रक्त, पाणी तसेच इतर द्रव्ये खालच्या दिशेने खेचते. यामुळे शरीरात ते संपूर्णपणे समान पद्धतीने वितरित होते. मात्र मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये गुरुत्वाकर्षण असत नाही यामुळे द्रव पदार्थ वरच्या भागाच्या दिशेने जातात. यामुळे चेहऱ्यावरील सूज, नाक जाम होणे तसेच डोक्यावरील दबाव वाढू शकतो. सोबतच खालचे शरीर कमकुवत आणि बारीक दिसू लागते. खरंतर, मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये हृदयाला रक्त पंप करण्यासाठी इतकी मेहनत घ्यावी लागत नाही जितकी पृथ्वीवर घ्यावी लागते. यामुळे हृदयाचा आकार बदलतो.

# सौ. कमलताई नरोटे यांच्या संपर्क कार्यालयाचे रावसाहेब दादा दानवे पाटील यांच्या हस्ते आज उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**




येथे कासलीवाल अपार्टमेंट मुकुंदवाडी या ठिकाणी माजी नगरसेविका सौ कमलताई नरोटे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन १९ मार्च सायंकाळी सात वाजता माजी केंद्रीय रेल्वेमंत्री राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, रावसाहेब दादा दानवे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य असा कार्यक्रम मुकुंदवाडी अंबिकानगरच्या वतीने हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज पाटील यांचा जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम सुद्धा होणार आहे.

राहुल नरोटे भारतीय जनता पार्टी युवा प्रदेश सचिव यांनी छत्रपती संभाजी नगरच्या सर्व युवकांना कार्यक्रमास नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# विवाह एक भीषण परिस्थिती...

पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी मोठ्या संख्येने दिसतील. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीचं न झाल्याने वृद्धाश्रमा मध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य काढण्याची वेळ येणार, यात शंका वाटत नाही. अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी ही पिढी स्वतः बरोबर पालकांना सुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंताना जन्म देत आहे.कारण मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालकांची गृहस्थाश्रमाची जबाबदारी संपते. पुढील पिढीकडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात. आता मागील एक पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता जास्त आहे. फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाड्या म्हणजे सर्व सुख नाही. कौटुंबिक आयुष्यात चांगली-वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पतीपत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकुलता सुद्धा सुसह्य होते. ती एकमेकांच्या पूरक भूमिकेमुळे.

शिक्षणाची पात्रता, आर्थिक कमाई, जमीनजुमला, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक कल्पना, ठराविक भौगोलिक क्षेत्रात म्हणजे मुख्यतः पुणे, मुंबई, नाशिक येथेच वास्तव्य असावे. याचा दुराग्रह, हट्टापायी विवाहाचे वय निघून जात आहे.

तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेही आपणचं आपल्यावर लादून घेतलेल्या अटीमुळे.

खरं तर बायोडाटा बघुन किंवा अभ्यासून त्यातील प्रतिकूल मुद्द्यांवर कशी मात करुन विवाहासाठी पार्श्वभूमी तयार करता येईल,याचा विवाहेच्छुक तरुण-तरुणींनी विचार गंभीरपणे करायला हवा. ठराविक बाबींचा अत्याग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे आणि कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ येत आहे. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारचं आहेत.पण सामाजिक संतुलन सुध्दा बिघडणार आहे. आपल्या संस्कृतीला सुद्धा याबाबी मारक ठरत आहेत.

स्त्री-पुरुषांच्या आयुष्याची पूर्णता ही वंशवृद्धी, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम या पायऱ्यांतूनच होत असते. आपण विवाह संस्थेचा पाया आणि ढाचा उखडून टाकत आहोत. आपले अपेक्षांचे दुराग्रह आपल्याला कुठे घेऊन जात आहेत.यावर गंभीर पणे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. लोकसंख्येत वृद्ध लोकांचे प्रमाण वाढल्याने जपान सारखे प्रगत, विकसित राष्ट्र गंभीर परिणामांना सामोरे जात आहे. घरातील वैयक्तिक विवाहाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टिकोनातून किती गंभीर आहे हे तेथील परिस्थितीचा अभ्यास केल्यास कळू शकेल. शेवटी जी तडजोड वय वाढल्यावर करणे अपरिहार्य आहे. त्यासाठी सगळे तारुण्यपणाला लावून अपेक्षांचे ओझे किती काळ वाहायचे एवढे करुन पुन्हा आपण केलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्याचं नाहीत तर मग इतका वेळ म्हणजे वाया गेलेली अमूल्य तारुण्याची वर्षे, घेतलेले efforts आणि वाढलेल्या वयाचे काय?

कृपया संवादाचे पुल बांधून लवकरात लवकर वैवाहिक आयुष्याची स्थिरता कशी प्राप्त करता येईल.यासाठी काय पावले उचलावीत लागतील याचा मुळापासून विचार व्हावा.

अशी अपेक्षा आज अपेक्षेचे ओझे वाढवून नाहक मुला-मुलींचे वय निघून जात आहे.याची खंत ना मुलांना ना पालकांना. आजचा काळ ,आजची परिस्थिती काही वर्षांनी तशीच राहील,हे सांगता येत नाही.आजचा पैसा,सुख,ऐश्वर्य, आरोग्य काही वर्षांनी तसेच राहील हे सुध्दा सांगता येत नाही. पालकांनो आणि मुला-मुलींनो भविष्याचा विचार करुन आजच निर्णय घ्या. अपेक्षांच्या जंजाळात अडकून न राहता समजदारीने निर्णय घ्या.योग्य वेळेत,योग्य वयात विवाहाचा निर्णय घ्या. काळ निष्ठुर आहे,चुकीला त्याच्याकडे माफी नाही.

# हडको जैन मंदिरात भगवंताला २०२४ नारळ अर्पण करून सिध्द चक्र विधानाची मोठया भक्ती भावाने सांगता



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.१००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर हडको टि.व्ही.सेंटर येथे अष्टानिका पर्वा निमीत्त सिध्दच क्र महामंडळ विधान पुजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची उत्साहात सांगता झाली. विधानामध्ये दररोज भगवंताचा पंचामृत अभिषेक, श्रीफळ अर्पण, आरती आदी कार्यकम उत्साहात संपन्न झाले. विधानामध्ये सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान अरूणा रमेश छाबडा, सह इंद्र उज्वला अशोक अजमेरा, दर्शना डॉ.शैलेश चांदीवाल, ज्योती प्रकाश सेठी, ज्योती संजय पाटणी, मिना प्रविण चांदीवाल, निर्मला दिलीप लोहाडे नाशिक आदींनी सहइंद्र म्हणुन पुजा केली. विधान यशस्वी करण्यासाठी ट्रस्ट चे अध्यक्ष कैलास कासलीवाल, अशोक अजमेरा, सुरजमल छाबडा, कार्यकारणी अध्यक्ष राजकुमार बडजाते, विधानाचे संयोजक संजय पाटणी, पंकज काला, डॉ.शैलेश चांदीवाल, दिनेश पाटोदी, प्रकाश सेठी, अशोक पहाडे, नितेश कासलीवाल, राहुल कासलीवाल, रूपेश छाबडा, सुमित बाकलीवाल, राजेद्र लोहाडे, रिदम पाटणी, पुष्पक बडजाते, मिना पापडीवाल, कविता अजमेरा, आशा कासलीवाल, पुष्पा गंगवाल, सुमन गंगवाल, राणी बाकलीवाल, किरण कासलीवाल, ललीत काला, ज्योती सेठी, संगीता बडजाते, संगीता काला, राजश्री कासलीवाल, अरुणा ठोले, कल्पना पहाडे, सोनाली पांडे, कैलास काला, त्रिशला सेठी, कांता काला, सरला कासलीवाल, दर्शना चांदीवाल, दिलीप काला प्रकाश ठोले आदींनी विधान यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. संजय जैन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विधानाची सांगता करण्यात आली. विधान यशस्वी करण्यासाठी विभा कासलीवाल, सपना बडजाते, संजना चांदीवाल यांनी सहकार्य केले. यांच्यासह धनपाल गंगवाल, कोमल गंगवाल, विलास अजमेरा, करिश्मा काला, अलका कासलीवाल, कल्पना पहाडे, ज्योती गंगवाल, मिना महावीर कासलीवाल, निलीमा ठोले, वंदना झांजरी, कल्पना झांजरी, सुनिता पांडे, कल्पना कासलीवाल, पुष्पा ठोले, सुवर्णा लोहाडे, मिना शहा, सौ.गोसावी यांच्यासह समाज बांधवांची विधानाला उपस्थिती होती. आठ दिवसात भगवंताला २०२४ श्रीफळ अर्पन करुन सिध्द च क्र विधानाची सांगता करण्यात आली. अशी माहिती प्रचार प्रसार प्रमुख नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

# औरंगजेब कबरीच्या मुद्यामुळे वातावरण तापले

## पर्यटक व भाविकांची खुलताबाद परिसराकडे पाठ; व्यवसायिकांच्या धंद्यांवर परिणाम; हजारो युवकांचा रोजगार जाण्याची भीती

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद येथील औरंगजेब कबरीच्या मुद्द्यामुळे देशभर वातावरण चांगलेच तापले असून भाविक व पर्यटक खबरदारीचा उपाय म्हणून खुलताबाद परिसरातील पर्यटन व धार्मिक स्थळांकडे येण्याचे टाळत असल्याने या खुलताबाद शहरासह परिसरातील व्यवसायांवर मोठा परिणाम होत आहे. यामुळे या परिसरातील धार्मिक व पर्यटन स्थळावर उद्योग करणाऱ्या हजारो युवकांचा रोजगार धोक्यात आला आहे. खुलताबाद तालुका हा पर्यटन व धार्मिक दृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण असून या परिसरात असलेल्या विविध धार्मिक व पर्यटन स्थळांवर दरवर्षी लाखो भाविक व पर्यटक येत असतात यामधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली असून व्यवसायकांनी आपली दुकाने या परिसरामध्ये लावलेली आहेत यामधून कित्येकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. येणाऱ्या पर्यटन व भाविकांवर येथील व्यवसायिकांचे रोजगार अवलंबून असल्याने या परिसराची संपूर्ण आर्थिक घडी पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे.



खुलताबाद शहराच्या मध्यवर्ती भागात व मुख्य रस्त्यावर असलेल्या आमने- सामने दर्ग्यापैकी हजरत जैनोद्दीन शिराजी यांच्या दर्गेमध्ये पूर्व पश्चिम कोपऱ्यामध्ये औरंगजेब ची कबर आहे. अतिशय साध्या पद्धतीची असलेली ही कबर देशभरातील चर्चेचा केंद्रबिंदू बनली आहे. अनेकांनी ही कबर काढून टाकण्याची मागणी करत आक्रमक भूमिका घेतली आहे तर काहींनी या ठिकाणी आक्रमण करून ती काढून टाकू आशा पद्धतीचे वक्तव्य केले असल्याने वातावरण चांगलेच तापले आहे. दर्गा परिसर व शहरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. या परिसरामध्ये केव्हाही काहीही होऊ शकते अशी भीती मनात बसल्याने परिसरातील वेरूळ येथे असलेल्या जगप्रसिद्ध कैलास लेण्या, बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर खुलताबाद येथील श्री भद्रा मारुती संस्थान, जर जरी जर बक्ष दर्गा, जैनोद्दीन शिराजी दर्गा, दत्तधाम सुलीभंजन, धार्मिक व पर्यटन असलेले म्हैसमाळ या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व भाविकांच्या संख्येत मागील काही दिवसांमध्ये कमालीची घट झाली आहे. परदेशी पर्यटक तर या परिसरात दिसणे अवघड झाले आहे. येणारे पर्यटक व भाविकांची संख्या कमी झाल्याने या खुलताबाद शहरासह परिसरातील व्यवसायिकांच्या व्यवसायावर चांगलाच परिणाम झाला आहे. काहींना आपल्या व्यवसायाचा खर्च भागविणे ही अवघड झाले आहे. पर्यटक व भाविक आले तरच या व्यवसायिकांचा व त्यावर अवलंबून असलेल्या युवकांचा रोजी रोटीचा प्रश्न मिटतो मात्र वातावरण तापत चालल्याने या भागात येणे सर्वजण टाळत आहेत.

औरंगजेब कबरी कडे जाणारा मुख्य मार्ग दोन्ही बाजूने बॅरेकेट्स लावून बंद करण्यात आल्याने या परिसरात वाहने जाणे अवघड झाले आहे त्यामुळे या परिसरातील कित्येक व्यवसायिकांचे धंदे ठप्प झाले आहेत. या परिसरातील फुल व्यवसायिक नाजीर अहमद हाफिजोद्दीन हॉटेल व्यवसायिक, शेख रियाज. अक्षय हजारे वेरूळ येथील व्यवसायिक अंकुश जाधव. बंडू सोनटक्के, यांच्यासह अनेक व्यवसायिकांनी मागील पंधरा दिवसांपासून येणाऱ्या पर्यटक व भाविकांची संख्या कमी झाली असून व्यवसायात कमालीची घट झाल्याचे सांगितले.

औरंगजेब कबरीला भेट देणाऱ्यांची माहिती पोलिसांकडून नोंदविण्यात येत असून या नुसार या कबरीला रविवार रोजी ७० सोमवार रोजी ६० मंगळवार रोजी ५० जणांनी भेट दिली. पोलीस बंदोबस्त व येणाऱ्या अडचणींमुळे येथे भेट देणाऱ्यांची संख्या कमी होत आहे

**हिंदू-मुस्लिम एकता का आदर्श** – देशभर वातावरण तापलेले असतानाच खुलताबाद शहर व परिसरातील सामाजिक सौधार्य चांगलेच टिकून आहे. या प्रश्नावर प्रतिक्रिया व्यक्त करणे हिंदू व मुस्लिम. समाजातील नागरिकांनी टाळले असून शांततापूर्ण वातावरणात व्यवसाय करू द्यावा अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली आहे.

# बिहार येथील बुद्ध गया महाबोधी विहार बौद्धाच्या ताब्यात द्या!

## संपूर्ण महाराष्ट्रात व देशभरात राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात आंदोलन व तीव्र निदर्शने




**दिनेश परदेशी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले शहर व जिल्हा शाखेच्या वतीने विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले. बौद्ध गया येथील महाबोधी महाविहार जिथे भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली हे स्थळ बौद्ध समुदायासाठी अतिशय महत्वाचं तीर्थक्षेत्र आहे. दुर्दैवाने, १९४९ च्या बोधगया मंदिर कायदा अंतर्गत या ऐतिहासिक स्थळाचं व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध समुदायाच्या हातात नाही. या कायद्यानुसार मंदिर व्यवस्थापन समितीमध्ये नऊ सदस्य असतात. त्यापैकी पाच अन्य समाजाचे आणि केवळ चार बौद्ध असतात. ही न्यायिक बाब नाही. हे बौद्ध समुदयाच्या हक्कांवर थेट हल्ला आहे. यावेळी विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

प्रामुख्याने बिहार येथील बुद्ध गया महाबोधी विहार बौद्धाच्या ताब्यात देण्यात यावे. तसेच १९४९ चा कायदा रद्द करून विहारमुक्तीसाठी नवीन कायदा करण्यात यावा या मागणीसाठी आज संपूर्ण महाराष्ट्रात व देशभरात राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात येत आहे. केंद्र शासनाने वेळीच दखल घेऊन महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी पावले उचलावीत अन्यथा देशभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले शहर व जिल्हा शाखेच्या वतीने बुद्धगया येथील महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे १८ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी बाबुराव कदम, मिलिंद शेळके, किशोर थोरात, विजय मगरे, नागराज गायकवाड, बाळकृष्ण इंगळे, अरविंद अवसरमोल, लक्ष्मण हिवराळे, राजेश पंडित, दिलीप पाडमुख, रवि जावळे, कुंदन लाटे, मनोज सरिन, रमेश दाभाडे, नितीन सूर्यवंशी, अनिल आगळे, मनोज भालेराव, आनंद शिंदे, महेंद्र शिंदे, राहुल मोरे आदींची उपस्थिती होती.

# मांदाडे अभ्यास गटाचा अहवाल आता मराठीतून व आक्षेपास १५ एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ मान्य- डॉ. राजेंद्र दाते पाटील

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग गोदावरी अभ्यास गट दोन यांचा अहवाल इंग्रजी भाषेत असुन तो मराठीत द्यावा व त्यानंतर हरकती आक्षेप नोंदवण्यासाठी मुदत वाढ देण्याची व इतर मागण्यावरील ८० पेक्षा जास्त हरकती व अभ्यासून आक्षेप जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे कडे ८ मार्च २०२४ पूर्वीच दाखल केला होता त्यातील अनुक्रमांक १७) सदरचा अहवाल मराठी भाषेत नसल्याने तो सर्व सामान्य शेतकरी व नागरीकांना तो योग्य पद्धतीने लक्षात येत नाही.१८) महाराष्ट्रात राज्यभाषा व मातृ भाषा मराठी.आहे त्यामुळे तो मराठीत मिळण्याचा हक्क आहे.१९) सदरचा अहवाल मराठी भाषेत प्रसारित करावा व आणि नंतर त्यावर आक्षेप व हरकती दाखल करण्यासाठी मुदत वाढवून द्यावी आणि २०) सदरच्या अहवाल मधील तक्ते त्यातील



आकडेवारी आणि एकूणच मराठीतील अनुवाद हा वाचनीय स्वरूपात उपलब्ध करून देण्यात यावा तसेच २१) सध्याचा अहवाल हा इंग्रजी भाषेत असुन तो स्पष्ट दिसत नसल्यामुळे अजिबात वाचता येत नाही त्यामुळे आक्षेप नोंदवण्यात सर्व सामान्यांना मर्यादा येत आहेत असे हरकत आक्षेप मान्य करण्यात आला असुन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने १४/०२/२०२५ रोजीच्या जाहीर सूचनेद्वारे गोदावरी अभ्यासगट अहवाल (२०२४) मधील परिशिष्टे १ ते ७, प्रपत्र १ ते १० आणि तक्ता क्र. ५ व ६ यावर अभिप्राय /हरकती असल्यास दि. १५/०३/ २०२५ पर्यंत प्राधिकरणास लेखी स्वरुपात किंवा ईमेल द्वारे सादर करण्याविषयी कळिवले होते. तथापि, प्राधिकरणास सदर अहवालातील परिशिष्टे व प्रपत्रे अस्पष्ट असल्याचे काही अभिप्राय प्राप्त झाले आहेत. तदनुसार सदर अहवालातील सुस्पष्ट परिशिष्टे १ ते ७,प्रपत्र १ ते १० आणि तक्ता क्र.५ व ६ प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली आहे. सबब, उपरोक्त जाहीर सूचनेद्वारे अभिप्राय / हरकती पाठविण्याची तारीख दि. १५/०४/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे असे प्रगटन सचिव महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी प्रसिध्दीस दिले असल्याची बाब आणि याच अनुषंगाने सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांना मल्लिकार्जून धरणे सचिव, मजनि प्राधीकरण यांनी लेखी पत्राद्वारे कळवली असल्याची माहिती आमच्या प्रतिनीधी सोबत बोलतांना मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंचचे निमंत्रक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली आहे.

बाष्पीभवनामुळे नष्ट होणारे पाणी,९ सदस्य असेलल्या अभ्यास गटाची रचना,मुळाप्रवरा,दारणा-गंगापूर- पालखेड- शिवना-जायकवाडी कॉम्प्लेक्स यातील तो फरक, एकात्मिक कार्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, सर्वच मापके भविष्यात चुक व अयोग्य ठरतील हे महत्त्वाचे निरीक्षण,कलम १२(६) नुसार अहवाल तयार न करणे, पाण्याचे समन्यायी वाटप न करणे, बाष्पीभवनाचे अयोग्य प्रमाण दर्शवणे, धरणाच्या साठवणुकीवर ६५ टक्के बंधन,नॉन युटीलाईझेशन ऑफ मॉडर्न टेक्नॉलॉजी' मुळे सर्वच मापके भविष्यात चुक व अयोग्य ठरतील,दिनांक १९ एप्रिल २०१७ रोजीचे न्याय निर्णय व अंमलबजावणी,समानता या तत्त्वावर असेलल्या पाणी वाटप कलम १२(६)(क) नुसार पाण्याचा मराठवाड्याचा हिस्सा तथा वाटा देण्यात यावा अशा एक ना अनेक अभ्यासु बाबी मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंचचे निमंत्रक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी आपल्या हरकती व आक्षेपात मांडल्या असुन मांदाडे अभ्यास गट अहवाल सुध्दा रद्द होण्यास पात्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# नागपूरमध्ये कशी झाली दंगल, मुख्यमंत्र्यांनी दिली माहिती

**मुंबई :** छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद येथे असलेली औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावरुन नागपूरमध्ये काही भागात दंगल झाली. या दंगलीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन दिले. नागपूरमध्ये नेमकी कोणकोणत्या भागात दंगल झाली ? दंगलीला कशी सुरुवात झाली ? दंगलीमुळे झालेले नुकसान ? नागपूरमधील सध्याची स्थिती ? याबाबतची सविस्तर माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. दंगल करणारे, पोलिसांवर हल्ले करणारे आणि सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणारे यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. विधानसभेत निवेदन देत मुख्यमंत्र्यांनी नागपूरमध्ये सोमवार १७ मार्च २०२५ रोजी दंगल का आणि कशी घडली याबाबतची सविस्तर माहिती दिली. संपूर्ण घटनाक्रम सांगितला. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाजी कबर हटवावी अशी मागणी करत नागपूरमध्ये सोमवार १७ मार्च रोजी आंदोलन केले. यावेळी प्रतिकात्मक कबरीला आग लावण्यात आली. एक कापड जाळण्यात आले. या कापडावर धार्मिक मजकूर होता अशी अफवा पसरली. ही अफवा पसरली आणि अत्तर ओळ येथून नमाज पढल्यानंतर २०० ते २५० लोकांच्या जमावाने घोषणाबाजी सुरू केली. याच लोकांनी आग लावून टाकू असे हिंसक बोलणे केल्याने पोलिसांनी त्याठिकाणी बळाचा वापर केला. पोलिसांनी सकाळी घडलेल्या घटनेविरोधात कारवाई करण्यासाठी तक्रारदारांना बोलवले होते. तर दुसरीकडे नागपूरच्याच हंसापुरी भागात २०० ते ३०० लोकांनी दगडफेक केली. काहींवर शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. अनेक वाहने जाळण्यात आली. हिंसाचाराची तिसरी घटना सायंकाळी साडेसात वाजता भालदारपुरा भागात झाली. ८० ते १०० लोकांचा जमाव तिथे होता. त्यांनी तिथे पोलिसांवर हल्ला केला. त्यामुळे पोलिसांनी अश्रूधूर व सौम्यबळाचा वापर केला. या घटनेत एक क्रेन दोन जेसीबी आणि काही वाहने जाळण्यात आली. या संपूर्ण घटनेमध्ये ३३ पोलीस जमखी झाले आहेत. यात उपायुक्त दर्जाच्या तीन पोलिसांचा समावेश आहे. यातील एका अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# देवगिरीमध्ये करियर कट्टा विभागीय पुरस्कार वितरण सोहळा व एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिनांक१८ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, व देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय पुरस्कार वितरण सोहळा व एकदिवसीय कार्यशाळा आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर डॉ अशोक तेजनकर होते प्रमुख पाहुणे डॉ. रणजीत सिंह निंबाळकर, सहसंचालक उच्च शिक्षण, छ. संभाजी नगर, श्री यशवंत शितोळे, अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, प्राचार्य डॉ. भारत खंदारे, व डॉ. संजय खरात यांची उपस्थिती होती. या करिअर कट्टा पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये एकूण ५८ करिअर कट्टा समन्वयकांना मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या पुरस्कार वितरण सोहळा व एकदिवसीय कार्यशाळा संबंधी ÷आणी करियर कट्टा संबंधीची भूमिका श्री यशवंत शितोळे यांनी विशद केली. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी करिअर कट्टा अंतर्गत राबविले जाणारे विद्यार्थीभिमुख उपक्रम आणि प्राध्यापकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन यासंबंधी माहिती दिली. करिअर कट्टा हा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा पथदर्शी उपक्रम असून या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय पूरक कौशल्य, रोजगारभिमुख कौशल्य, उद्योगमार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा आदी संबंधी मोफत मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत आहे . या करिअर कट्टा अंतर्गत नॅक बदललेली पुनर्मूल्यांकन पद्धती या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. नॅक पुनर्मूल्यांकन आणी करियर कट्टा उपक्रम आदी संदर्भात प्राचार्य डॉ संजय खरात यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणामध्ये केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ अशोक तेजनकर यांनी करियर कट्टाद्वारे उपलब्ध असणारे करियर ओरिएंटेड प्रोग्राम, विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी राबविण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणीसाठी पूरक कार्यक्रम आहेत. करिअर कट्टा अंतर्गत अभ्यासक्रमांना नॅक श्रेणी आणी मानांकन मार्गदर्शक तत्वे यामध्ये अनन्य साधारण महत्व आहे. करियर कट्ट्याद्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन मार्गदर्शन वर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, केले जाते याचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घेतला घेतला पाहिजे आणि करिअर कट्टा उपक्रमामध्ये सहभाग वाढवला पाहिजे. यावेळी त्यांनी पुरस्कार प्राप्त करिअर कट्टा समन्वयक, प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे विभागीय समन्वयक डॉ. राजेश लहाने यांनी पाहुण्यांचा परिचय तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. लक्ष्मीनारायण कुरपटवार यांनी आभार मानले. या एकदिवशीय पुरस्कार वितरण आणि कार्यशाळेसाठी संभाजीनगर विभागातून १६९ जणांनी सहभाग नोंदवला. यामध्ये प्राचार्य, करिअर कट्टा समन्वयक, प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# माजी सैनिक, वीरनारी, पाल्य यांच्याकरीता कौशल्य विकास प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा वीर नारी पाल्याकरीता कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी htt{s://bit.ly/skillcourses या संकेतस्थळावर १३५ अभ्यासक्रमांची यादी प्रकाशीत करण्यात आली आहे. ती याप्रमाणे- कृषी प्रशिक्षण - ६४, वेशभुषा - ९, यांत्रिकी - ७, सौंदर्योपचार - २१, फर्निचर- ७, रंग व लेपन - ४, सुरक्षा सेवा -२, क्रीडा - १४, पर्यटन व आतिथ्य - ७ या प्रशिक्षणांसाठी माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरनारी, पाल्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२४०-२३७०३१३ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा,असे कळिवण्यात आले आहे.

# स्वराज्य संकल्पक शहाजीराजे यांची ४३१ वी जयंती उत्साहात साजरी

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ४३१ वी जयंती श्रीक्षेत्र वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गडीवर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली,यावेळी मराठा आरक्षणाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील ह. भ. प. अक्का महाराज, अभयानंद गिरीजी महाराज, नागेश्वरानंद महाराज, मारुती नंद महाराज, जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी वेरूळ ग्रामस्थ तसेच शिवभक्तांच्या उपस्थितीत महंत १०८ जनेश्वरानंद महाराज यांनी स्वराज्य संकल्प शहाजीराजे भोसले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

समंत भद्र विद्यालयातील तसेच जगद्गुरु जनार्दन स्वामी विद्यालय येथील शिक्षक वृंद तथा ३००० विद्यार्थी विद्यार्थिनी यांचीशस्त्र प्रदर्शन बघण्यासाठी तथा अभिवादनासाठी उपस्थिती होती. अभिवादना नंतर जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच संतांच्या वतीने महंत जनेश्वर महाराज यांनी सर्व शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या आणि संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या शुभेच्छा पर भाषणात राजेंद्र पवार करत



असलेल्या कार्याचे कौतुक केले शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन संघर्ष योद्धा माननीय मनोज जरांगे पाटील व सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले.

याप्रसंगी आलेल्या सर्व पाहुण्यांच साधुसंतांच पूजन सत्कार करण्यात आला माळशेंदा येथून आलेले शिवभक्त शिंदखेड राजा ते वेरूळ दिंडीने आलेले शिवभक्त हिंगोलीहून आलेले हरिभक्त परायण गंगाधर महाराज कुरुंदकर शस्त्र प्रदर्शन लावणारे महाबली शहाजीराजे भोसले चॅरिटेबल ट्रस्ट नांदेड बाजीप्रताप शामसुंदर मोरे यांचाही सत्कार जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी सोहळा समितीचे स्वागत अध्यक्ष प्रकाश पाटील मिसाळ, किरण पाटील डोणगावकर, कृष्णा पाटील डोणगावकर अनिल श्रीखंडे माणिकराव शिंदे, मनोज गायके, विजय भालेराव, किशोर काळे, अनिल मिसाळ, सुनील पाटील कोटकर, मच्छिंद्र पाटील देवकर ,आप्पासाहेब कुढेकर, विजय राठोड, महेश पाटील उबाळे, गणेश नाना अधाने, तथा सर्व पदाधिकारी गावकरी यांनी आलेल्या पाहुण्यांच स्वागत सत्कार केला.

# शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञान सातत्याने अवगत करावे ज्येष्ठ अधिव्याख्याता प्रा. गणेश शिंदे यांचे प्रतिपादन

## सेलू येथे तालुकास्तरीय शालेय व्यवस्थापन समिती सक्षमीकरण प्रशिक्षणास उत्साहात सुरुवात

**सेलू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनविन बदल होत असून शिक्षकांनी नवनवीन तंत्रज्ञान सातत्याने अवगत करावे व निरंतर अपडेट राहावे असे प्रतिपादन परभणी डाएट चे ज्येष्ठ अधिव्याख्याता तथा सेलू तालुका संपर्क प्रमुख अधिकारी प्रा गणेश शिंदे यांनी केले.तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षात सेलू तालुक्यातील गुणवत्ता वाढीसाठी विशिष्ट कृती कार्यक्रम राबविणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

येथील केशवराज बाबासाहेब विद्यालयात पंचायत समिती शिक्षण विभाग सेलू गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित तालुकास्तरीय शालेय व्यवस्थापन समिती सक्षमीकरण प्रशिक्षण उदघाटन सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी



व्यासपीठावर परभणी जि. प चे प्राथमिक उपशिक्षणाधिकारी तथा सेलू चे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गजानन वाघमारे,परभणी येथील हर्टफुल नेस मेडिटेशन एकात्मिक अभियान चे जयप्रकाश भंडारी, मीनाताई भंडारी, किशोर जामकर, श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयाचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सिद्धार्थ एडके, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बालासाहेब हळणे आदिची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी मान्यवरांचे योगेश ढवारे यांनी लिहिलेल्या भाषण एक कला हे पुस्तकं भेट देऊन स्वागत करण्यात आले.

पुढे बोलताना शिंदे सरांनी निपुण भारत अभियान व कृती कार्यक्रम तथा शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक म्हणून आपली जबाबदारी यावर समर्पक मार्गदर्शन केले. मार्गदर्शन पर मनोगतात गजानन वाघमारे साहेबांनी सर्व शिक्षकांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.सेलू तालुका समन्वयक सुनीता काळे यांच्या आयोजनाखाली या प्रशिक्षणास प्रारंभ झाला. जयप्रकाश भंडारी व मीना ताई भंडारी यांनी मेडिटेशन ची ४५ मिनिटांची तासिका घेऊन सर्वांना ध्यानाचे महत्व पटवून दिले.

दोन दिवस चालणाऱ्या या तालुकास्तरीय प्रशिक्षणासाठी १०५ शिक्षक प्रशिक्षण घेणार असून सुलभक म्हणून नीळकंठ पाटील, रावजी चिलके, राम रोडगे, मोहम्मद बदरुद्दीन हे कार्य पार पाडणार आहेत. या प्रशिक्षण उदघाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट समन्वयक सुनीता काळे यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार योगेश ढवारे यांनी मानले. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी भूजंग थोरे,विषय शिक्षक आश्विनी आमले,डेटा ऑपरेटर अरुण राऊत आदी परिश्रम घेत आहेत.

# नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पंचाळेश्वर येथे वार्षिक यात्रा उत्साहात संपन्न

## छत्रपती संभाजीनगर शहरासह देशभरातील भक्तांची यात्रेला उपस्थिती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र हे भारत भर प्रसिध्द आहे. गोदावरी काठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येर्णाया भाविकांचे आकर्षण ठरत आहे. वार्षिक यात्रा महोत्सव व पंचामृत अभिषेक सोहळा हा उत्साहात संपन्न झाला. या यात्रेसाठी मुनिश्री सुवंध्यसागरजी महाराजांच्या सानिध्यात उत्साहात संपन्न झाली. सर्वप्रथम सालाबादा प्रमाणे भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. तदनंतर शोभाबाई अजितकुमारजी सेठी यांच्या हस्ते ध्वजारोहन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. बोलीया प्रारंभ करुन भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यामध्ये इंद्र-इंद्राणी होण्याचे मान सुनिलकुमार पाटणी परिवार यांना मिळाला, तर शांती मंत्राचा मान रेखा वर्धमान सेठी यांना मिळाला. यावेळी मुनिश्रीचे पादपक्षालन क्षेत्राच्या पदाधिका-यांनी केले तर कार्यकमाचे



सुत्रसंचालन प्रविण लोहाडे यांनी केले तर प्रास्ताविक कोषाध्यक्ष संजय सेठी यांनी केले. आ.विजयराजे पंडीत, मनोज पाटणी,सुनिल अजमेरा, बदाम बाई बाई बाकलीवाल शांतीलाल पहाडे .विजय चुडीवाल, महेंद्र पांडे, प्रविण लोहाडे, संतोष बाकलीवाल, संजय लोहाडे, मधुकर खोबरे, सुरेश जैन, नरेंद्र अग्रवाल, संजय सु. कासलीवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित भाविकांना सुंदरलालजी सुनिलकुमार प्रितम भावेश व्दिवीक रिदीत प्रेरीत पाटणी परिवार यांच्या तर्फे महाप्रसाद देण्यात आला होता. यावेळी डॉ.सुगनचंद केवलचंद कासलीवाल उमापुरवाला आडुळ अतिथी निवास भवन चे भुमीपुजन तसेच नवनिर्माणाधिन वास्तुचे भुमीपुजन करण्यात आले. यावेळी भाविकांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. तर महिलांनी केशरी व पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान केल्या होत्या. वार्षिक यात्रेचे औचित्य साधुन मंदिर परिसरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली. त्यामुळे मंदिर परिसर उजळुन निघाला होता. यावेळी भगवंतांवर दुध, दहि, केशर आदि रसांनी अभिषेक करण्यात आला. यावेळी भाविकांनी शुध्द सोहळ्याचे वस्त्र परिधान केले होते. यात्रेसाठी औरंगाबाद, बीड, गेवराई, पाचोड, आडुळ, जालना, देऊळगांव राजा, पैठण, अंबड, वैजापूर श्रीरामपूर आदि ठिकाणाहून शेकडो भाविक उपस्थित होते.

संपुर्ण कार्यक्रम हा आचार्य मयंक सागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने घेण्यात आला होता. यात्रा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गौतमचंद काला,उपाध्यक्ष वृषभ गंगवाल, ॲड. सुहास चुडीवाल, सचिव भाऊसाहेब बाकलीवाल, कोषाध्यक्ष संजय सेठी, सहसचिव विजय पापडीवाल,कैलास खोबरे, प्रकाश सेठी, विलास पहाडे, भगवानदास काला, अशोक कासलीवाल, राजेंद्र काला, संतोष अजमेरा, हिरालाल घोंदलकर, संदीप कासलीवाल, सुनिल

# वेरूळ येथील शहाजी भोसले गढीवर शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

## ३०० दुर्मिळ शस्त्र पाहण्याची शिवप्रेमींना संधी



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे दिनांक १८ रोजी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या ४३१ व्या जयंतीनिमित्त वेरूळ येथील गढीवर शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले असून यामध्ये जवळपास ३०० दुमिर्ळ शस्त्र प्रदर्शित करण्यात आलेले आहेत आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार या प्रदर्शनाला शिवप्रेमींनी भेट द्यावी असे आवाहन शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी केले आहे, हिंदवी स्वराज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल नाणी शिवराई, शिवरायांची दुदांडी नाणी, रायगडी शिवराई, पेशवे कालीन मराठा नाणी, खंडा तलवार, गुर्ज मराठा धोप, विजयनगर साम्राज्य कट्यार, वाघनखे, ब्रिटिश तलवार,भाला, कत्ती तलवार,मराठा तलवार, मुघल तलवार, माडू, दांडपट्टा, ढाल, तोफगोळा, तोफ, कुलपी गोळा, जबरदंड, जननाळ, तेगा तलवार, मराठा कट्यार, मुघल कटयार, गड किल्ल्याचे कुलूप, कुकरी, अंकुश, चिलानम, बिचवा, धनुष्यबाण, राजपूत तलवार, खंजराली, जंबिया व गुप्ती असे एकूण ३०० शिवकालीन व ऐतिहासिक शस्त्रे यावेळी प्रदर्शनाच्या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहेत. प्रदर्शनातील ठेवलेले शस्त्र हे ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण आहे नांदेड येथील महाबली शहाजीराजे भोसले ट्रस्ट संचलित शिवकालीन शस्त्र बघण्याची दुमिर्ळ संधी शिवप्रेमींना मिळाली आहे. याकरता ट्रस्टचे अध्यक्ष बाजी प्रताप पाटील यांनी विशेष सहकार्य केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**